# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २९१-२२ दिनांक १/१०/२०२२

## मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन ४ गुन्हयांची उकल - नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दि २१/०९/२०२२ रोजी रात्रौ ०८.३० वा. फिर्यादी नामे विनोद वासुदेव नाईक, व्यवसाय इलेक्ट्रीशियन, रा. आलोक निवास, साकोरे आळी, नवाळे गाव, पोस्ट निर्मळ, नालासोपारा (पश्चिम) यांनी त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल क्र.एम.एच.०४सी.एक्स.७८५५ ही त्यांचे राहत्या घराचे अंगणात पार्क करुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांची मोटारसायकल चोरी केल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४१२/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

मोटारसायकल चोऱ्यांचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी नामे महेश लखु दादोडे, रा. वसईफाटा यास दिनांक २९/०९/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये तसेच तुळींज पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात ४ मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेकडून चोरीस गेलेल्या ४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे -

| अनु.क्र. | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| १. | नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. I ४१२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये. |
| २. | नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. I ३७४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये. |
| ३. | नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. I ४२६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये. |
| ४. | तुळींज पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. I ६०६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये. |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ , श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, पो.ना. सचिन कांबळे, अमोल तटकरे, पो.शि. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर यांनी केलेली आहे.




------------ooooooo----------------